# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:27.05.2024** **वारःसोमवार**

---

1.लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीच्या प्रचाराला वेग
2.मोबाइल सेवा प्रदात्यांना आंतरराष्ट्रीय बनावट कॉल ब्लॉक करण्यासाठी सरकारचे निर्देश
3.वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर, कामाच्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना करण्याचा आरोग्य मंत्रालयाचा सल्ला
4.आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात कोलकाता नाइट रायडर्सचा विजय
आणि
5.पश्चिम बंगालच्या किनारपट्टीला तडाखा दिल्यानंतर रेमल चक्रीवादळाचा बांग्लादेशात प्रवेश

**प्रचार**
लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. विविध राजकीय पक्षांच्या दिग्गज नेत्यांचे आपल्या पक्षाच्या उमेदवारांसाठी प्रचार सुरू आहेत.या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातील अशा एकंदर ५७ लोकसभा मतदारसंघांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे.

**बनावट कॉल्स**
मोबाइल सेवा प्रदात्यांना आंतरराष्ट्रीय बनावट कॉल ब्लॉक करण्यासाठी सरकारने निर्देश जारी केले आहेत. दळणवळण मंत्रालयाने एका निवेदनात ही माहिती दिली आहे. फसवणूक करणारे काही जण, भारतीय नागरिकांना भारतीय मोबाइल नंबर दाखवून त्यांना आंतरराष्ट्रीय बनावट कॉल करतात आणि सायबर-गुन्हे तसंच आर्थिक फसवणूक करत आहेत. हे कॉल्स भारतातून आल्यासारखे वाटतात मात्र प्रत्यक्षात परदेशातील सायबर-गुन्हेगार कॉलिंग लाइन आयडेंटिटीमध्ये फेरफार करून तसं भासवतात. बनावट डिजिटल अटक, फेड-एक्स घोटाळे, कुरिअरमधे ड्रग्ज- अंमली पदार्थ, तोतया सरकारी आणि पोलिस अधिकारी, दूरसंचार विभाग – 'ट्राय' कडून मोबाईल क्रमांक कायमस्वरूपी बंद करणे अशा अनेक प्रकरणांमध्ये या कॉल्सचा गैरवापर होत आहे. असे बनावट कॉल ओळखण्यासाठी आणि ते ब्लॉक करण्यासाठी दूरसंचार विभाग तसंच मोबाइल सेवा पूर्वणाऱ्या कंपन्यांनी एक प्रणाली तयार केली आहे. भारतातल्या कोणत्याही मोबाइल ग्राहकाला येणारे असे आंतरराष्ट्रीय बनावट कॉल्स दूरसंचार विभागाने जारी केलेल्या निर्देशांनुसार आधीच ब्लॉक केले जात आहेत. तसे निर्देश मोबाइल सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांनाही जारी करण्यात आल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**आयुष**
आयुष मंत्रालयाच्या वतीनं आज नवी दिल्लीतल्या अखिल भारतीय आयुर्वेद सामान्य विमा कंपन्या आणि आयुष रुग्णालयांच्या मालकांसाठी जनजागृती कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमाचा उद्देश केवळ नागरिकांना सुलभ आणि किफायतशीर उपचार देण्याचाच नसून देशातील सार्वजनिक आणि खाजगी आयुष रुग्णालयांच्या विमा संरक्षणामध्ये सुसूत्रता आणण्याचाही आहे असं मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. या कार्यक्रमाद्वारे आरोग्य विमा योजनांचा नियामक आराखडा तयार करून त्यामध्ये आयुष उपचारांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, तसंच आव्हाने आणि संधी या दोन्हींचे निराकरण करण्यासाठी प्रमुख भागधारकांमधील संवाद सुलभ करण्यावर चर्चा करण्यात येईल. त्याचबरोबर आयुष क्षेत्रातील विमा संरक्षण, विमा क्षेत्रासाठी मानक उपचार मार्गदर्शक तत्त्वे, विमा क्षेत्रातील आयुषचा प्रवेश आदी विषयांवरही चर्चा होणार आहे.

**उष्णता**
वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्रालयाने कर्मचाऱ्यांसाठी कामाच्या ठिकाणी उष्णतेच्या आवश्यक उपाययोजना करण्याचा सल्ला मालकांना दिला आहे. कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचं आवाहन मंत्रालयांन केलं आहे. तापमान कमी असतानाच्या वेळेत कामाचं आणि विश्रांतीचं वेळापत्रक तयार करण्याचा उपाय मंत्रालयांन सांगितला असून उष्णतेशी संबंधित आजाराची लक्षणे ओळखण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा सल्ला ही दिला आहे. अति उष्णतेमुळे, शरीरावर पुरळ उठणे, थकवा आणि डोकेदुखी, चक्कर येणे, निर्जलीकरण आणि श्वासोच्छवासाच्या समस्या उद्भवू शकतात. मात्र ही उष्णतेशी संबंधित आजाराची सामान्य लक्षणे आहेत, असे मंत्रालयाने म्हटले आहे.दरम्यान, कमाल तापमानात सतत होणारी वाढ लक्षात घेऊन भारतीय हवामान विभागानं काल दिल्लीसह उत्तर भारतातल्या अनेक राज्यांसाठी 'रेड अलर्ट' जारी केला आहे. दिल्लीत तापमान ४३ ते ४७ अंशांच्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.

**पांडे**

मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांच्या सेवेत 30 जूनपर्यंत एक महिना मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे. 31 मे या त्यांच्या सेवानिवृत्तीच्या पुढे ही मुदतवाढ देण्यात आली आहे. ३० एप्रिल २०२२ रोजी लष्करप्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारण्यापूर्वी त्यांनी लष्कराच्या उपप्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली होती.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात ]

**<u>जयशंकर</u>**
जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा बदलली असून नवी दिल्लीच्या परराष्ट्र धोरणाचं यश हे देशाच्या देशांतर्गत धोरणाचे प्रकटीकरण आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते काल वाराणशीमध्ये जागतिक मुत्सद्देगिरीत भारताचा विजय या कार्यक्रमात बोलत होते. आज भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि जगाला भारतात व्यवसाय आणि उपक्रम सुरू करायचे आहेत या मुद्यावरही त्यांनी भर दिला. आपण प्रमुख अर्थव्यवस्थांवर नजर टाकली तर भारताचा ७ टक्के विकास दर जगात सर्वाधिक आहे. जगाला भारताबद्दल आस्था आहे. भारताच्या व्यापार आणि निर्यातीत वाढ होते आहे असं ते म्हणाले. विकास दर वाढला असून महागाई कमी झाली असल्याचं त्यांनी नमूद केलं .भारताच्या परराष्ट्र धोरणावर बोलताना जयशंकर म्हणाले की, देशात पूर्वी आत्मविश्वासाचा अभाव होता मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशानं आत्मविश्वासपूर्ण परराष्ट्र धोरण राबवून दाखवलं आहे. आज भारताचे अमेरिका ,रशियापासून इराण आणि इस्त्राएलपर्यंत अनेक देशांशी सलोख्याचे संबंध असून भारत शांघाय सहकार्य संघटना आणि ब्रीक्स सारख्या संघटनांचा भाग आहे असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>पंतप्रधान</u>**
कान चित्रपट महोत्सवात पुरस्कार मिळालेल्या चित्रपट दिग्दर्शिका पायल कपाडिया यांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमाद्वारे अभिनंदन केलं आहे. ग्रां प्रि जिंकण्याच्या त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल भारताला अभिमान वाटत असल्याचं मोदी यांनी म्हटले आहे.पायल यांची प्रतिभा जागतिक स्तरावर चमकत असून यातून भारताच्या सर्जनशीलतेचं दर्शन होत आहे. हा पुरस्कार केवळ पायल यांचा सन्मान नाही, तर यामुळे भारताच्या नव्या पिढीच्या चित्रपटकर्मींना प्रेरणा मिळेल, असंही पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंग ठाकूर यांनीही राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था अर्थात एफ टी आय आय च्या माजी विद्यार्थिनी पायल कपाडिया यांच्या यशाबद्दल अभिनंदन केलं आहे. गेल्या ३ दशकांमध्ये पहिल्यांदाच पायल कपाडिया यांनी दिग्दर्शित केलेल्या 'ऑल वी इमॅजिन ॲज लाइट' या चित्रपटाने ग्रां प्रि पुरस्काराला गवसणी घातली. पायल कपाडिया हा बहुमान मिळवणाऱ्या पहिल्यावहिल्या **<u>भारतीय आहेत</u>**.
भारत हा जगातील सर्वात मोठा फीचर फिल्म निर्माता आहे आणि आपण एकत्रितपणे भारताला सर्जनशील क्षेत्रात महाशक्ती बनवू शकतो असं सांगून सरकार प्रत्येक इच्छुक चित्रपट निर्मात्याला संसाधनं देण्यासाठी आणि सहकार्य करण्यासाठी वचनबद्ध असल्याचं ठाकूर यावेळी म्हणाले.

**<u>योग</u>**
10 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त नवी दिल्लीची मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था आणि आयुष मंत्रालयाच्या वतीने आज बिहारमधील बोधगया इथे एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या २५व्या कार्यक्रमाच्या उलट गणतीचा एक भाग म्हणून हा कार्यक्रम असल्याचं मोरारजी देसाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ योगाचे संचालक डॉ. काशिनाथ समगंडी यांनी गया इथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<u>आयपीएलक्रिकेटपूलमाधुरी २७.३०पासून</u>**
आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या च्या अंतिम सामन्यात काल कोलकाता नाइट रायडर्स नं सनरायझर्स हैदराबाद चा 8 गडी राखून पराभव केला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या सनरायजर्स संघ 113 धावांवर सर्वबाद झाला. चेन्नईच्या एम ए चिदंबरम स्टेडियमवर झालेल्या सामन्यात सनराईजर्सच्या 114 धावांचा पाठलाग कोलकाता नाइट रायडर्सनं केवळ10 षटकं आणि 3 चेंडूत पूर्ण केला. केकेआर कडून व्यंकटेश अय्यरने नाबाद 52 आणि रहमानउल्ला गुरबाजने 39 धावा केल्या. मिशेल स्टार्क ला सामना वीर घोषित करण्यात आलं.

**<u>रेमल</u>**
रेमल चक्रीवादळानं बांग्लादेशचा किनारा ओलांडल्यानंतर त्याचा जोर आता कमी झाला आहे. दरम्यान ,काल रात्री उशिरा रेमल चक्रीवादळ बांगला देशाच्या खेपुपारा आणि बंगालच्या उपसागरातल्या बेटांदरम्यान दाखल झालं. त्यामुळे उत्तर आणि दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील सुंदरबन आणि किनारी भागात मुसळधार ते अति मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. हावडा, हुगळी, कोलकाता, नादिया जिल्ह्यातही तसंच उत्तर बंगालमध्ये मालदा इथं पाऊस पडत आहे. कोलकाता शहर आणि उपनगरात सोसाट्याचा वारा वाहत असून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या 14 तुकड्या पश्चिम बंगालमध्ये बचाव आणि मदत कार्य करत आहेत. याशिवाय, आवश्यकतेनुसार मदतीसाठी अतिरिक्त पथकं नेमण्यात आली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात एक विशेष नियंत्रण कक्ष तर, कोलकाता पोलीस मुख्यालयात एकात्मिक नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे.

**<u>रेमल बैठक</u>**
उत्तर बंगालच्या उपसागरात "रेमल" चक्रीवादळाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत एक बैठक घेतली. बैठकीदरम्यान, त्यांना राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन समिती पश्चिम बंगाल सरकारच्या नियमित संपर्कात असल्याची माहिती देण्यात आली . सर्व मच्छिमारांना दक्षिण बंगालच्या उपसागरात आणि अंदमानच्या समुद्रात जाऊ नये असा सल्ला देण्यात आला असून सुमारे एक लाख लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं जात आहे. भारतीय हवामान विभाग बांगलादेशलाही नियमित आणि अद्ययावत माहिती देत आहे.

यावरोबरच ही राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार